**अपंग-अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्याची योजना**

# महाराष्ट्र शासन
## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
## शासन निर्णय क्रमांकः अपंग- २०१३/प्र.क्र.१०३/अ.क.२

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
तारीख: **१७ जून, २०१४**

**प्रस्तावना -**

अपंग व्यक्ती (समान संधी,हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ मधील तरतुदींनुसार अपंगांकरीता विविध कल्याणकारी योजना शासनाकडून राबविण्यात येत आहेत. अपंगांच्या सामाजिक सुरक्षिततेचा एक भाग म्हणून, अपंग व्यक्तींना आपले कौटुंबिक जीवन व्यतीत करता यावे यासाठी अपंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन मिळावे व विवाहासाठी आर्थिक मदत उपलब्ध व्हावी याकरीता आंतरजातीय विवाह करणाऱ्यांना जोडप्यांना ज्या प्रकारे आर्थिक सहाय्य दिले जाते, त्याप्रमाणे अपंग-अपंगत्व नसलेल्या विवाह करणाऱ्या जोडप्यांना आर्थिक सहाय्य देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

समाजातील अपंगत्व असलेल्या व्यक्तींना सर्वसाधारण व्यक्तींप्रमाणे आपले कौटुंबिक जीवन व्यतीत करता यावे यासाठी अपंग व अपंगत्व नसलेल्या व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन दिल्यास निश्चितपणे अपंग व्यक्तींशी अपंगत्व नसलेल्या व्यक्ती विवाह करण्यास प्रोत्साहित होत, याकरीता राज्यात आंतरजातीय विवाहाच्या धर्तीवर अपंग व अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्याच्या योजनेस या शासन निर्णयाव्दारे मंजूरी देण्यात येत आहे. सदर योजनेची मार्गदर्शक तत्वे /सूचना खालीलप्रमाणे आहेत:-

१. अपंग व अव्यंग विवाहितांना प्रोत्साहन देण्याची ही योजना किमान ४०% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या व्यक्तीशी अपंगत्व नसलेलया सुदृढ व्यक्तीने विवाह केल्यास त्या जोडप्यास सदर योजना लागू आहे.

२. दिनांक १ एप्रिल, २०१४ या आर्थिक वर्षापासून नव्याने विवाहित होणाऱ्या जोडप्यांना सदर योजना लागू होईल.

३. किमान ४०% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या अपंग वधू किंवा वराने अपंगत्व नसलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास अथवा अपंग नसलेल्या वधू किंवा वराने अपंग असलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास खालीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येईल:-

अ. रक्कम रुपये २५०००/- चे बचत प्रमाणपत्र

आ. रुपये २०,०००/- रोख स्वरुपात

इ. रुपये ४५००/- संसार उपयोगी साहित्य/वस्तू खरेदीसाठी देण्यात येईल.

ई. रुपये ५००/- स्वागत समारंभाच्या कार्यक्रमाचा खर्च करण्यासाठी देण्यात येईल

४. सदर योजनेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत:-

i) वधू अथवा वराकडे अपंग व्यक्ती अधिनियमाप्रमाणे किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त अपंगत्वाचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र असावे

PDF Scanner ACE Scanner

ii) अपंग वधू किंवा वर यापैकी एक महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा

iii) विवाहित वधू व वराचा प्रथम विवाह असावा.वधू अथवा वर घटस्फोटीत असल्यास अशा प्रकारची मदत यापूर्वी घेतलेली नसावी.

iv) विवाह हा कायदेशीररित्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेला असावा.

v) विवाह झाल्यानंतर किमान एका वर्षाच्या आत त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधीत समाज कल्याण अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

५. सदर योजना मुंबई शहर व उपनगरकरीता सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व इतर जिल्हयांकरीता जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत राबविण्यात यावी. समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे अर्थसहाय्याकरीता नमुना अर्ज परिशिष्ट “अ” मध्ये ठेवलेला आहे. सर्व समाजकल्याण अधिकारी यांना कळविण्यात येते की, या योजनेतंर्गत प्रत्येक आर्थिक वर्षात प्राप्त होणारे अर्ज, त्या-त्या आर्थिक वर्षात निकाली काढणे आवश्यक राहील. याकरीता सर्व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांचेकडे प्राप्त झालेले अर्ज हे वर्षातून दोन वेळा निकाली काढणे आवश्यक राहील. माहे सप्टेंबर व माहे मार्च या दोन महिन्यात प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सहा महिन्यांत प्राप्त झालेले अर्ज निकाली काढण्यात यावेत. याकरिता, एप्रिल व सप्टेंबर या कालावधीत प्राप्त झालेले अर्ज सप्टेंबरच्या शेवटच्या आठवडयात समारंभपूर्वक निकाली काढावेत व ऑक्टोबर ते मार्च या कालावधीत प्राप्त झालेले अर्ज मार्च महिन्यात समारंभपूर्वक निकाली काढावेत. मुंबई शहर व उपनगर याकरीता सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांनी वरील सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी.

६. सर्व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषदा हे प्राप्त झालेल्या अर्जांची योग्य ती छाननी तो प्राप्त झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांत करतील. या योजनेतंर्गत अर्थसहाय्याकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना सोबतच्या परिशिष्ट “अ” येथे जोडण्यात आलेला आहे. या अर्जातील सर्व बाबी पूर्ण असल्याशिवाय समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अर्जांचा स्विकार करु नये. अर्जामध्ये काही त्रुटी /काही कागदपत्रे कमी असल्याचे आढळून आल्यास संबंधित अर्जदाराला तात्काळ त्याठिकाणी तसे सांगण्यात यावे. एकदा जर अर्जदाराकडून अर्ज प्राप्त करुन घेतला तर याचा अर्थ अर्जदारांनी दिलेली सर्व माहिती बरोबर आहे व संबंधित अधिकाऱ्यांनी /कर्मचाऱ्यांनी ही माहिती पाहून व कागदपत्रांची पाहणी करुन हा अर्ज स्विकारलेला आहे असे समजण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत अर्जदाराचा अर्ज आवश्यक कागदपत्रांच्या अभावी किंवा अर्जात त्रुटी आहेत म्हणून निकाली काढण्याचा प्रश्न उद्भवणार नाही.

७. सदर योजनेचे नियंत्रण अधिकारी हे आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे राहतील.

८. आयुक्त, अपंग कल्याण हे जिल्हानिहाय तरतुदींचे वाटप करुन देतील. सदर विवाहित जोडप्यांनी आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत सादर केलेल्या अर्जास अंतीम मान्यता देण्याचे काम समाज कल्याण अधिकारी,



ACE Scanner

जिल्हा परिषद यांचे स्तरावरच केले जाईल. कोणत्याही परिस्थितीत अशाप्रकारे मान्यता देण्यासाठी हे प्रकरण सहाय्य आयुक्त, समाज कल्याण (मुंबई शहर व उपनगर वगळता) किंवा प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण यांचे स्तरावर पाठविण्यात येऊ नये.

९. कोणत्याही लाभार्थ्याने या योजनेचा लाभ दोन वेळा घेऊ नये यासाठी लाभार्थ्यांनी सादर केलेल्या (अ) विवाह नोंदणी दाखला, (ब) वर/वधू यांचा शाळा सोडल्याचा दाखला तसेच (क) वर /वधू यांच्या अपंग प्रमाणपत्राच्या मूळ प्रतीच्या मागील बाजूस "अपंग-अव्यंग विवाह प्रोत्साहनपर अनुदान देण्यात आलेले आहे" असा रबरी शिक्का मारण्यात यावा.

१०. सर्व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांचे कार्यालयात परिशिष्ट " क" येथे नमूद केल्याप्रमाणे नोंदवही नमुन्यात माहिती ठेवावी.

११. माहे ऑक्टोबर व माहे एप्रिलच्या पहिल्या आठवडयात सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सोबतच्या परिशिष्ट "ब" येथे नमूद केलेली माहिती आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठवावी. सर्व जिल्हयांची संकलित केलेली जिल्हानिहाय एकत्रित माहिती आयुक्त, अपंग कल्याण यांनी शासनास सादर करावी.

१२. सदर योजनेतंर्गत लाभार्थ्यांचे अर्ज दि. १ एप्रिल, २०१४ पासून स्विकारण्यात येतील. तथापि निधीच्या उपलब्धतेनंतरच योजनेची प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरु होईल.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक - २०१४०६१७१६२९५८५२२२ असा आहे.. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramhari Dagdu Shinde

Digitally signed by Ramhari Dagdu Shinde
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Social Justice &Spl Assistance, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ramhari Dagdu Shinde
Date: 2014.06.18 11:22:31 +05'30'

**रा. द. शिंदे**
**सचिव, सामाजिक न्याय विभाग**

प्रत,

१. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा /विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई
२. मा. राज्यपाल यांचे सचिव,राजभवन, मलबार हिल, मुंबई,
३. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,



PDF Scanner ACE Scanner

५. सर्व मंत्री / राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. मुख्य सचिव यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
८. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. सर्व मंत्रालयीन विभागांचे अमुस /प्र.स./सचिव,
१०. आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
११. संचालक, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे,
१२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, मुंबई
१३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई
१४. सर्व जिल्हाधिकारी,
१५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१६. सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
१७. सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
१८. सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
१९. महालेखापाल, महाराष्ट्र -१ /२ (लेखा लेखापरिक्षा), मुंबई /नागपूर
२०. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई/नागपूर
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२२. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
२३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई (५ प्रती प्रसिध्दीसाठी)
२४. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्ष (प्रत्येकी ५ प्रंती)
२५. विधानमंडळ ग्रंथालय, विधान भवन, मुंबई (१० प्रती)
२६. सर्व कार्यासने ,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई,
२७. निवड नस्ती, का- अ.क.२



PDF Scanner ACE Scanner

## परिशिष्ट- अ

आंतरजातीय विवाहाच्या धर्तीवर अपंग व अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन
देण्याच्या योजनेतंर्गत अर्थसहाय्य मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

अर्जदाराचे नांव:-
पत्ता :-

दिनांक:-

प्रति,
मा. समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद,
जिल्हा:-

विषय:- अपंग व अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य मिळणेबाबत

महोदय,

आम्ही दिनांक रोजी अपंग-अव्यंग योजनेतंर्गत विवाह केलेला आहे. त्यासंबंधीची आवश्यक माहिती या अर्जाव्दारे सादर करीत आहे. कृपया मला अपंग-अव्यंग विवाहितांस देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनपर योजनेतून अर्थसहाय्य मंजूर व्हावे, ही विनंती.

(अ) वराची माहिती-
- अ) वराचे संपूर्ण नांव -
- ब) अपंगत्वाचे प्रमाण-
- क) शिक्षण
- ड) व्यवसाय /उद्योग
  कार्यालयाचे नाव /हुद्दा
- इ) मूळ राहण्याचे ठिकाण

(ब) वधूची माहिती-
- अ) वधूचे संपूर्ण नांव -
- ब) अपंगत्वाचे प्रमाण-
- क) शिक्षण
- ड) व्यवसाय /उद्योग
  कार्यालयाचे नाव /हुद्दा
- आ) मूळ राहण्याचे ठिकाण

(क) इतर माहिती- विवाहाचा दिनांक :- विवाह स्थळ:-
- i) विवाह पध्दती:- वैदिक /नोंदणी
- ii) प्रथम विवाह आहे काय ? वर:- होय /नाही वधू :- होय /नाही



PDF Scanner ACE Scanner

iii) लग्नापूर्वी विदुर /विधवा होते काय ? वर:- होय /नाही वधू :- होय /नाही

iv) यापूर्वी सदर योजनेखाली अर्थसहाय्य मागणी केली आहे काय ? :- होय /नाही
अन्य जिल्हा परिषदेकडे अर्ज केला असल्यास, होय /नाही
जिल्हा परिषदेचे नाव
व अर्ज दिनांक

v) जिल्हा परिषदेकडे अर्ज केला असल्यास दिनांक :-

vi) यापूर्वी सदर योजनेखाली सत्कार झाला आहे काय? :- होय /नाही

vii) होय असल्यास कोठे व केव्हा ?
(लागू नसेल ते खोडावे)

वरील सर्व माहिती आमच्या माहितीप्रमाणे सत्य व अचूक आहे. त्यामध्ये काही चूक आढळून आल्यास आपणाकडून होणाऱ्या परिणामास मी जबाबदार राहीन.

सही वर :-
सही वधू :-

---

(कार्यालयीन कामासाठी)

ड) अर्जाची छानणी करुन सर्व माहिती व सत्यप्रती बरोबर असल्याचे आढळून येतात.

अर्ज स्वीकारणाऱ्या व्यक्तीचे नांव :-
हुद्दा :-
स्वाक्षरी :-
दिनांक :-

---

टीप- अर्जासोबत खालील सत्य प्रती जोडाव्यात.

१) विवाह नोंदणी दाखला
२) वर /वधू यांचे शाळा सोडल्याचे दाखले
३) वर अथवा वधू यांचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र
४) वर/वधूचे एकत्रित फोटो
५) दोन प्रतिष्ठित व्यक्तींची शिफारसपत्रे
६) महाराष्ट्राचे रहिवासी असल्याबाबत अधिवास (Domiciled) प्रमाणपत्र.

**टीप:-** हा अर्ज परिपूर्ण व बिनचूक असल्याशिवाय समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने अर्ज स्विकारु नये

**टीप :-** एकदा अर्ज स्वीकारल्यानंतर हा अर्ज परिपूर्ण आहे, सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडलेल्या आहेत असेच समजण्यात येईल.



PDF Scanner ACE Scanner

## परिशिष्ट- ब

समाजकल्याण विभाग,
जिल्हा परिषद,

सन २०              या आर्थिक वर्षातील अपंग - अव्यंग  विवाहित जोडप्यांना दिलेल्या अर्थसहाय्याची माहिती.

१)  माहे  १ एप्रिल              ते  ३० सप्टेंबर                      या सहा महिन्यांची माहिती

२)  माहे  १ ऑक्टोबर             ते ३१ मार्च,                      या सहा महिन्यांची माहिती

३)  सन  २०            या आर्थिक वर्षासाठी प्राप्त तरतुद  :-

४)  प्राप्त तरतुदीमधून किती लाभार्थ्यांना लाभ देणे शक्य आहे   :-
( एकूण तरतूद :-  रु. ५०,०००/-    एकूण लाभार्थी )

५)  माहे १ एप्रिल, २०          ते ३० सप्टेंबर, २०     व माहे १ ऑक्टोबर,२०        ते ३१ मार्च,२०
या कालावधीत लाभ दिलेल्या अपंग -अव्यंग जोडप्यांची संख्या  :-

स्वाक्षरी,
समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद,



PDF Scanner ACE Scanner